| MHKO170003882020 | **अंतिम हुकूमनामा क्र. ०१/२०२०**<br>**सौ. बालिनी पांडुरंग पाटील**<br>**वि.**<br>**श्री. भगवान गणू पोवार** |
|---|---|

## नि. १९ वरील आदेश

१. अर्जदाराने प्रस्तुत अर्ज या न्यायालयाने दिलेल्या नियमित दिवाणी मुकदमा ४०/२०१६ मध्ये केलेल्या हुकूमनामेनुसार दावा मिळकत सिटीसर्वे क्रं. १३१५ मधील इमारत याचा ग्रा. मि. नं. १४३४ व येथील गट क्र. ४१७/१ मधील इमारत याचा ग्रा. मि. नं. ५९४१ यामधील इमारतीचे व क्षेत्राचे मोजमाप करून अर्जदार यांना १/६ हिस्सा देय करणेकरिता व वाटप नकाशा सहित सुचविणेकरिता कोर्ट कमीशनर यांची नेमणूक होणकरिता प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जावर सामनेवाला यांना पुरेशी संधी देवूनही त्यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे या अर्जावर सामनेवाला यांचे म्हणणे नाही असा आदेश पारीत करण्यात आला व प्रस्तुत अर्ज सामनेवाला यांचे म्हणणेशिवाय चालविण्यात आला.

३. अर्जदार तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुत दावा हा वाटपाकरिता दाखल करण्यात आलेला होता. त्यामुळे घर मिळकतीचे वाटप होणेकरिता न्यायालयीन आयुक्त नेमणे गरजेचे आहे. तसेच मूळ दाव्याच्या आदेशामध्ये न्यायलयीन आयुक्त नेमणूक करणेबाबत आदेश करणेत आलेला नाही. मात्र संपूर्ण न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता त्यामध्ये घर मिळकत नमूद आहे. त्यामुळे तेथे न्यायालयीन आयुक्त नेमणे हे कायद्याने आवश्यक होणारे आहे. अर्जदार तर्फे वकील यांनी न्यायालयीन आयुक्त म्हणून दोन सन्माननीय विधीज्ञ यांची नावे सुचित केल्याबाबतची

पुरसीस दाखल केली. अंतिमतः अर्जदार तर्फे वकील यांनी न्यायालयीन आयुक्त नेमणेत यावा अशी विनंती केली.

४. प्रस्तुत अर्ज हुकूमनामा आणि त्यासोबत हजर करण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. न्यायालयाने नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक ४०/२०१६ मध्ये घर जमिनीचे वाटपाबाबत कोणत्याही विशिष्ट शब्दात आदेश पारित केलेला नाही. मात्र प्रस्तुत न्यायनिर्णयाचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता, त्यामध्ये वाटप हे घर मिळकतीचे देखील झालेले आहे ही गोष्ट स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात घर वाटप न्यायालयीन आयुक्त नेमून करणे योग्य होईल असे वाटते.

५. तसेच अर्जदार तर्फे देण्यात आलेली पुरसीस पाहता या कामी पन्हाळा बारचे सन्माननीय विधीज्ञ श्री. एस. एन. पाटील यांची घर जमीन मिळकतीचे प्रस्तावित वाटप नकाशासहित सुचविण्यासाठी न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करणे योग्य व संयुक्तिक होईल असे वाटते. त्यामुळे मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. **वकील श्री. एस. एन. पाटील यांचे दावा मिळकत गाव कोडोली येथील सिटीसर्वे क्रं. १३१५ मधील इमारत याचा ग्रा. मि. नं. १४३४ व गट क्र. ४१७/१ मधील इमारत याचा ग्रा. मि. नं. ५९४१ यामधील इमारतीचे व क्षेत्राचे मोजमाप करून अर्जदार यांचा १/६ हिस्सा सुचविण्यासाठी न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.**

२. **अर्जदार यांनी न्यायालयीन आयुक्ताचे शुल्क रक्कम रु.५०००/- हे पुढील तारखेपर्यंत अगर तत्पूर्वी या न्यायालयात जमा करावयाचे आहे.**

३. **वकील श्री. एस. एन. पाटील यांना निर्देश देण्यात येत आहे की, न्यायालयीन आयुक्ताचे नेमून दिलेले काम न्यायालयीन आयुक्त शुल्क जमा झाल्याच्या**

तारखेपासून एक महिन्याचे आत पूर्ण करुन त्याचा सविस्तर अहवाल नकाशासहित न्यायालयासमोर हजर करावयाचा आहे.

४. वकील श्री. एस. एन. पाटील यांनी न्यायालयीन आयुक्ताचे काम करताना संबंधितांना पूर्व नोटीसी देऊन न्यायालयीन आयुक्ताचे काम करावयाचे आहे.

५. कोडोली पोलीस स्टेशन यांनी न्यायालयीन आयुक्त यांना प्रस्तुत कामी पोलीस मदतीची गरज पडल्यास त्याबाबतची शासकीय फी घेवून तात्काळ पोलीस मदत पुरवावी.

६. येणेप्रमाणे कमिशन पत्र पाठविण्यात यावे.

सही/–

दि. २०/०६/२०२५.

**( के. दि. काकतकर )**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पन्हाळा